# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
### रविवार, दिनांक १ डिसेंबर, २०१९ / अग्रहायण १०, १९४१ (शके)

१३३. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, "**लोकलेखा समितीचा "पासष्टावा" व "सहासष्टावा", "सदुसष्टावा" तसेच "अडुसष्टावा" अहवाल**" रविवार, दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी विधानपरिषदेच्या पटलावर ठेवण्यात आला. सदर अहवालाच्या मुद्रित प्रती त्याच दिवशी सदस्यांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपालखणांद्वारे वितरीत करण्यात आल्या आहेत.

१३४. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, "**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचे (१) विनियोजन लेखा अहवाल (२) वित्तीय लेखा खंड १ व २ अहवाल (इंग्रजी प्रत) गुरुवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०१९ रोजी विधानपरिषदेच्या पटलावर ठेवण्यात आले. सदर अहवालांच्या मराठी प्रती** " रविवार, दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी विधानपरिषदेच्या पटलावर ठेवण्यात आले. सदर अहवालाच्या मुद्रित प्रती त्याच दिवशी सदस्यांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपालखणांद्वारे वितरीत करण्यात आल्या आहेत.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १ डिसेंबर, २०१९

**राजेंन्द्र ग. भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

**प्रति :-**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२. मा.सभापती व उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव व खाजगी सचिव.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
४. प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
६. संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.